# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र ११० दिनांक- २२/०४/२०२१

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर मनाई आदेश लागू .

कोविडच्या अनुशंगाने महाराष्ट्र शासन "ब्रेक द चैन" अंतर्गत विविध निर्देश देत आहे.त्यानुसार दिनांक २२/४/२०२१ रोजी शासनाने केलेल्या निर्देशानुसार मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कोरोना आजाराचे वाढत्या संसर्गाचे पार्श्वभूमीवर, शासनाचे फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ अंतर्गत मनाई आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत.

त्यानुसार सर्व शासकीय कार्यालयातील उपस्थिती (राज्य, केंद्र व स्थानिक प्राधिकरण अंतर्गत) मध्ये १५ टक्के बंधनकारक आहे.कोव्हिड-१९ महामारी व्यवस्थापनाशी प्रत्यक्ष सलग्न असणाऱ्या सेवा यातून वगळण्यात आल्या आहेत.

विवाह सभारंभाचे आयोजन सभागृहात करून त्यामध्ये जास्तीत जास्त २५ व्यक्ती उपस्थित राहु शकतील व दोन तासापेक्षा जास्त वेळ सदर सभारंभ चालणार असे निर्देश दिले आहेत.

खाजगी आणि सार्वजनिक प्रवासी वाहतुकीवर प्रवासी क्षमतेनुसार बंधने टाकण्यात आली आहेत. बसेस वगळता खाजगी प्रवासी वाहतुक केवळ आपत्कालीन किंवा आवश्यक सेवांसाठी चालकासह वाहनाच्या ५० टक्के क्षमतेने वैध कारणांसाठी चालु ठेवली आहे. खाजगी वाहने आंतरजिल्हा किंवा आंतर शहर प्रवास करु शकणार नाही व प्रवासी त्यांच्या राहते शहरातच प्रवास करु शकतील. आपत्कालीन परिस्थितीत किंवा अंत्यविधी सारख्या किंवा कुंटुबातील गंभीर अजारपणात भाग घेण्यासाठी आवश्यकता भासल्यास अंतरजिल्हा किंवा अंतरशहर प्रवासात परवानगी आहे.प्रवासी उतरतील तेथे सदर प्रवाशांना १४ दिवसांकरीता गृहविलगीकरण करण्याबाबत शिक्का मारण्याची जबाबदारी बससेवाचालकाने पार पाडणेविषयी निर्देश दिले आहेत.

सर्व शासकीय श्रेणीतील (राज्य, केंद्र, स्थानिक प्राधीकरण) कर्मचारी, सर्व वैद्यकीय कर्मचारी यांना लोकल ट्रेन, मेट्रो ट्रेन किंवा मोनो रेल सेवा (लांब पल्याच्या गाडया वगळता) चा प्रवासा करीता वापर करता येईल,अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

सदरचा मनाई आदेश मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दिनांक २२/०४/२०२१ रोजी रात्रौ ०८.०० ते दिनांक ०१/०५/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वा. दरम्यान लागू आहे.

Scanned by CamScanner